# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail : cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ३० दिनांक २४/०२/२०२१

## घर विसरलेल्या वयोवृध्द महिला (आजी) चे नातेवाईकांचा अर्नाळा पोलीसांनी सहा तासात शोध घेवुन दिले मुलीचे ताब्यात

दि.२३/०२/२०२० रोजी संकाळी ०९-३० वाजता सुमारास नागरीक श्री. गजानन अनंत मेहेर यांनी १०० नंबरवर मिरा-भायंदर, वसई विरार नियंत्रण कक्ष येथे कळवीले की, एक वयोवृध्द महिला (आजी) नवापुर नाका या ठिकाणी असुन, तिचे नातेवाईकांबाबत काहीएक माहिती सांगत नाही. सदर माहिती नियंत्रण कक्ष कडूण पो.स्टे. अर्नाळा येथे प्राप्त झाल्या बरोबर तात्काळ दखल घेवुन पो.स्टे. अर्नाळाचे सपोनि/बी.बी. मुसळे, चालक पाटील यांनी सद ठिकाणी जावुन वयोवृध्द महिला (आजी) यांना पोलीस ठाण्यात आणुन विचारपुस केली असता त्यांचे नांव सुभद्रा अर्जुन म्हस्के, वय ६५ वर्षे असे सांगीतले परंतु त्यांना वास्तव्या बाबत काही माहिती सांगता येत नव्हती. त्यांचे नातेवाईकांचे शोध घेणे कामी आजीचे फोटो व्हॉटसअॅप ग्रुपवर प्रसारीत केले असता, व्हॉटसअॅप च्या माध्यमातुन सदर आजीचे नातेवाईकांचा शोध लागुन त्या श्रीमती कविता जगदिश थोपटे, सुभाष लेन काळयाचा पाडा अर्नाळा यांची आई असल्याचे निष्पन्न झाल्याने खात्री करुन आजीला त्यांचे मुलीचे ताब्यात दिले. या बाबत सदर आजीचे मुलीने पोलीसांचे कामाबाबत समाधान व्यक्त केले.

सदरची कामगिरी अर्नाळा पोलीस ठाणेचे सपोनि/बी.बी.मुसळे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि/तुषार माळोदे, सफौ/गहिले, पोहवा/अवतार, पोना/राठोड, चालक/पाटील, मपोकॉ/दुर्ग यांनी केलेली आहे.

---------- oooo ---------